MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318


Vidyawarta UGC Jr.No.62759 UGC Approved Refereed Journal

ANNIVERSARY CELEBRATIONS 6th ANNIVERSARY 2018

# Vidyawarta®

Issue-21, Vol-01, Jan. to March 2018

International Multilingual Research Journal




Editor
Dr.Bapu G.Gholap

Scanned by CamScanner

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक संशोधन पत्रिका

# विद्यावार्ता™

UGC Approved
Jr.No.62759

Jan. To March 2018
Issue-21, Vol-01

**Editor**
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned by CamScanner

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
UGC Approved Jr.No.62759
Vidyawarta®
Jan. To March 2018
Issue-21, Vol-01


28) भारतातील शेतकरीआत्महत्या: एक गंभीर समस्या
Dr. Vasant Nanarao Patange || 127

29) स्पर्धा परीक्षामध्ये व्याकरणाचे महत्व
प्रा. डॉ. कालिदास गुडदे , पालम जि. परभणी || 132

30) जैन दर्शनाचा विश्वव्यापक तात्विक दृष्टीकोन
प्रा.डॉ.सखाराम यशवंतराव गोरे, जि.नांदेड || 134

31) कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता ११ वी च्या विद्यार्थ्यांचा स्वसंकल्पना ताण व वैफल्य यांच्यातील ......
डॉ. शोभा महारु चौधरी, धुळे. || 137

32) स्वच्छ भारत मोहिमेची वाटचाल
डॉ. एन. यु. देशमुख , वाशिम || 139

33) महाविद्यालयातील प्राध्यापकांमधील नॅक विषयी असलेल्या अभिवृत्तीचा तुलनात्मक अभ्यास.
डॉ. सुनील परशुराम पाटील, धुळे || 142

34) ललित कला और संस्कृति पर विज्ञान और प्रौद्योगिकी का प्रभाव
डॉ. अश्विनीकुमार सिंह, बड़ौदा, गुजरात || 144

35) स्कूली बच्चों ( बालक वर्ग )में मोबाइल फोन का प्रयोग : एक ......
डॉ. सुधीर कुमार श्रीवास्तव, रूद्रपुर, देवरिया उ.प्र. || 148

36) बुद्धकालीन गणिकाओं का संक्षिप्त अध्ययन
शिखा पाठक, लखनऊ || 157

37) दलित चेतना और डॉ. आंबेडकर
डॉ. बळीराम संभाजी भुक्तरे, उदगीर, जिला. लातुर || 159

38) शिक्षक प्रशिक्षणार्थियों की अधिगम उपलब्धि पर व्याख्यान विधि के प्रभाव .....
रूबी चौहान, प्रो. बी.सी. दूबे, मेरठ || 162

39) बाल श्रम और मानवाधिकार
प्रा. दिपक एस, मगरदे, वर्धा || 165

40) पाडर दा संस्कृतिक अध्ययन
सोनिका जसरोटिया, जम्मू || 168

www.vidyawarta.com/03 — http://www.printingarea.blogspot.com



Scanned by CamScanner

माध्यमातुन ग्रामीण भागात शिक्षणाची चळवळ उभी केली. भु - विकास बँकेच्या माध्यमातुन ग्रामीण भागात आर्थिक स्वयंपूर्णता आणि सुबत्ता आणण्याचा प्रयत्न केला. ग्रामीण विकासाच्या विविध योजना त्यांनी राबविल्या ग्रामीण भागात पायाभूत सुविधा उभ्या राहाव्यात यासाठी त्यांनी प्रयत्न केले. समाजकारण आणि राजकारणाबरोबर त्यांना पत्रकारितेची देखील आवड होती. सन १९६६ साली शिवबा नावाचे साप्ताहिक त्यांनी सुरु केले. पत्रकरिता समाज परिवर्तनाचे एक महत्वाचे माध्यम आहे याची त्यांना जाण होती. शिवबा या साप्ताहीकाच्या माध्यमातुन समाजाच्या ज्वंलत प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम त्यांनी केले. एकदंरित महाराष्ट्राच्या राजकीय, .सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि आर्थिक जडणघडणीत मा. बाबुरावजी काळे यांचे योगदान उल्लेखनीय आहे.

संदर्भ :-

1) Maharashtra Legislative Assembly De bate, Vol. VII , No. 25, 12 July 1962, PP 1201 - 1202.

2) Maharashtra Legislative Assembly De bates, Vol. VII , No. 25 - 26, 12 July 1962, PP 1226 - 1227.

3) Maharashtra Legislative Assembly De bates, Vol. 62 VII , No. 1 to 16, 28 Aug 1981, PP 9/69 - 9/70

४) दै. लोकविजय, औरंगाबाद, दि. २०/१०/१९८५.

५) दै. लोकमत, औरंगाबाद, दि. १९ ऑक्टोबर १९८५.

६) दै. लोकमत, औरंगाबाद, दि. १९ ऑक्टोबर १९८५.

7) Mahrashtra Legislative Assembly De bates, Vol 59, No. 1 to 32 , 26 July 1980 P. 22/41 - 22/45.

8) Mahrashtra Legislative Assembly De bates, Vol 61 No. 24 to 34 , 13 April 1981, P. 30/156 - 30/159.

९) क्षितीजा पल्याड, बाबुरावजी काळे यांची विधिमंडळातील निवडक भाषणे, पंडित नलावडे, २७ फेंब्रुवारी २०१४.

❑❑❑

**28**

# भारतातील शेतकरीआत्महत्या : एक गंभीर समस्या

**Dr. Vasant Nanarao Patange**
Asst. Prof.
Business Economics & Banking
A. R. B. Garud College,Shendurni, Jalgaon

***********

प्रस्तावना :

कृषी क्षेत्राविषयीच्या प्रतिकूल धोरणामुळे शेतकरी आत्महत्येसारखी गंभीर समस्या भारतात निर्माण झाली आहे. भारतातील शेतकरी आत्महत्या दिवसें दिवस वाढत आहेत, त्यामुळे भारतीय कृषीक्षेत्रासमोर एक मोठे आव्हान निर्माण झाले आहे.जागतिक स्तरावरही शेतकरी आत्महत्या होत आहेत.भारतीय अर्थव्यवस्था कृषिप्रधान असून शेतकऱ्यालाच आत्महत्या करावी लागत आहे हे भारतीय अर्थव्यवस्थेचे अपयश व दुर्दैवही म्हणावे लागेल.पूर्वी उत्कृष्ट शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी मानले जायचे आज शेतीची अनेक भागात अशी अवस्था झाली आहे की दुसरा पर्याय नाही म्हणून नाईलाजास्तव शेतकरी शेती करित आहेत.भारतात एकूण लोकसंख्येच्या तुलनेत ६० टक्के लोकसंख्या एकट्या कृषीवर अवलंबून आहे. पूर्वी पासूनच शेतकरी अस्मानी आणि सुल्तानी संकटात भरडला जात आहे.पूर्वी बाह्य आक्रमण व्हायची त्यात ही शेतीच मोठे नुकसान व्हायचे व इतरही कारणामुळे शेतीचे उत्पादन कमी व्हायचे.कालांतराने शेतीशी संबधित सावकार, व्यापारी यांची भरभराट झाली मात्र शेतकऱ्याची स्थिती फारशी सुधारली नाही. स्वातंर्त्या नंतर उद्योग व सेवा या दोन्ही क्षेत्राच्या तुलनेत कृषी क्षेत्राला नेहमीच दुय्यम स्थान मिळाल आहे.

शेतकरी आत्महत्येमुळे अनेक कुटुंब उध्दवस्त झाली असून त्याचे गंभीर परिणाम समाजव्यवस्थेवर होत आहेत.देशातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा



Scanned by CamScanner

अतिशय गंभीर मुद्दा असून या समस्यवर मूळ तोडगा काढण्याची सूचना सर्वोच्य न्यायालयाने केंद्रसरकारला केली आहे.शेतकरी आत्महत्या कमी करण्यासाठी शासनाने अनेक उपाय योजले परंतु ते फारसे प्रभावी ठरले नाहीत.शासनाने केलेल्या उपायातून शेतकऱ्याएवजी इतर घटकांचाच अधिक फायदा झाला आहे.शासन एकीकडे कर्जमाफी किंवा आर्थिक मदत जाहीर करते तर दुसरीकडे शेतमालाला योग्य दर मिळत नाही म्हणजेच त्याच्या उत्पनात वाढ होत नाही व पुन्हा त्याला कर्जाशिवाय पर्याय उरत नाही.

प्रस्तुत अध्ययनात भारतातील शेतकरी आत्महत्याची सद्यस्थिती, शेतकरी आत्महत्यची कारणे शोधून त्यावर उपाय योजना सुचविण्यात आल्या आहेत.

**✍ अध्ययनाचीउद्दिष्ट –**

१.भारतातील शेतकरी आत्महत्यांची सद्यस्थिती अभ्यासणे.
२.भारतातील शेतकरी आत्महत्यांची कारणे शोधणे.
३.शेतकरी आत्महत्या कमी करण्यासाठी उपाय सुचविणे.

**✍ भारतातीलशेतकरीआत्महत्येचीसद्यस्थिती :**

भारतात प्रगत राज्यांमध्ये शेतकरी आत्महतेचे प्रमाण जास्त आहे,यात ही शेतकरी आत्महत्येत महाराष्ट्र आघाडीचे राज्य आहे. भारतातील शेतकऱ्यांच्या एकूण आत्महत्येपेकी ६० टक्के आत्महत्या या महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, कर्नाटक व मध्यप्रदेश या राज्यात झाल्या आहेत.एन.सी.आर.बी. च्या अहवालानुसार २०१२ मध्य १०००० लोकसंख्येमागे शेतकरी आत्महत्येचे प्रमाण भारतात १.३६ आहे तर राज्य निहाय हे प्रमाण महाराष्ट्र–३.३०,कर्नाटक–३.१२, केरळ–३.०९,सिक्कीम –३.०५ व आंध्रप्रदेश –३.० आहे. यावरून असे लक्षात येते की या राज्यांचे हे प्रमाण राष्ट्रीय स्तरापेक्षा दुप्पटीने जास्त आहे व हे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.राज्यनिहाय एकूण आत्महत्यांमध्ये शेतकरी आत्महत्येचे प्रमाण महाराष्ट्रात २३.५० टक्के,असून ते सर्वाधिक आहे त्यानंतर आंध्रप्रदेश– १८.१० टक्के,उत्तरप्रदेश –१६.८ टक्के,कर्नाटक–१४.७० टक्के आणि केरळ–१२.७० टक्के आहे. या पाच राज्यांमध्ये एकुण आत्महत्येमध्ये शेतकरी आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे.२०१३ नंतर सरासरी १२००० शेतकरी दरवर्षी आपले जीवन संपवत आहेत,अशी आकडेवारी केंद्रसरकारने सर्वोच्य न्यायालयाला सादर केली आहे.एन.सी.आर.बी. च्या अहवालानुसार लहान शेतकर्यांच्या आत्महत्येचे प्रमाण सर्वाधिक असून त्या खालोखाल अल्पभूधारक शेतकरी व मध्यम शेतकरी आहेत, मोठ्य शेतकऱ्यांमध्ये आत्महत्यचे प्रमाण कमी आहे. शेतकरी आत्महत्येची वयानुसार विभागणी केल्यास २०१५ मध्ये ३० ते ६० वयोगटातील शेतकरी आत्महत्येचे प्रमाण ७१.६ टक्के आहे व ६० पेक्षा जास्त वय असणाऱ्यांचे प्रमाण ९ टक्के आहे तर उर्वरित १८ वर्ष पेक्षा कमी आहेत.

तक्ता क्र.१ मध्ये भारतातील काही निवडक राज्यातील शेतकरी व शेतमजुरांच्या २०१४–२०१५ या वर्षातील शेतकरी व शेतमजूर आत्महत्या दर्शविल्या आहेत.

तक्ता क्र. १ भारतातील निवडक राज्यातील शेतकरी व शेतमजूर आत्महत्या (२०१४ – २०१५ )

| अ.क्र. राज्य | २०१४ | प्रमाण | २०१५ | प्रमाण | २०१४ च्या तुलनेत २०१५ मधीलशेतकरी आत्महत्येचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| १. महाराष्ट्र | ४००४ | ३२.३९ | ४२९१ | ३४.०५ | ७.२ |
| २. तेलंगाना | १३४७ | १०.९ | १४०० | ११.११ | ३.९ |
| ३ मध्यप्रदेश | ११९८ | ९.६९ | १२९० | १०.२४ | ७.७ |
| ४. कर्नाटक | ७६८ | ६.२१ | १५६९ | १२.४५ | १०४.३ |
| ५ छत्तीसगढ | ७५५ | ६.११ | ९५४ | ७.५७ | २६.४ |
| ६ आंध्रप्रदेश | ६३२ | ५.११ | ९१६ | ७.२७ | ४४.९ |
| ७. तामिळनाडू | ८९५ | ७.२४ | ६०६ | ४.८१ | ३२.३ |
| ८ उर्वरित राज्य व केंद्रशाषित प्रदेश | २७६१ | २२.३४ | १५७६ | १२.५१ | ४२.८७ |
| ९. भारत | १२३६० | १०० | १२६०२ | १०० | २.० |

**स्रोत : एन.सी.आर.बी. रिपोर्ट २०१५**

तक्ता क्र.१ वरून असे स्पष्ट होते की भारतात शेतकरी आत्महत्या २०१४ मध्ये १२३६० व २०१५ मध्ये १२६०२ झाल्या आहेत. राष्ट्रीय स्तरावर शेतकरी आत्महत्येत २०१४ च्या तुलनेत २०१५ मध्ये २ टक्केनी वाढ झाली आहे.कर्नाटक राज्यात २०१४ च्या तुलनेत २०१५ मध्ये शेतकरी आत्महत्येत दुप्पटीपेक्षाही जास्त वाढ झाली आहे तर तामिळनाडू मध्ये मात्र २०१४ च्या तुलनेत २०१५ मध्ये शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण कमी झाले आहे.तामिळनाडू व्यतिरिक्ति इतर राज्यात २०१४ च्या तुलनेत २०१५ मध्ये आत्महत्येच्या प्रमाणात वाढ झाली आहे. महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्येचे प्रमाण (भारताच्या



Scanned by CamScanner

एकुण प्रमाणात ) २०१४ मध्ये ३२.३९ टक्के होते त्यात २०१५ मध्ये वाढ होऊन ३४.०५ टक्के झाले आहे.भारतातील उर्वरित राज्य व केंद्रशाषित प्रदेशांच्या तुलनेत महाराष्ट्रातील आत्महत्यांचे प्रमाण २०१५ मध्ये जवळपास तिप्पट आहे तर महाराष्ट्रानंतर असणाऱ्या तीन राज्यातील शेतकरी आत्महत्ये एवढयाआत्महत्या एकट्या महाराष्ट्रात झाल्या आहेत.पी.साईनाथ या जेष्ठ पत्रकाराच्या मते तर महाराष्ट्रात १९९५ ते २०१३ या काळात ६०००० पेक्षाही जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. म्हणूनच पी.साईनाथ यांनी महाराष्ट्राचे वर्णन 'शेतकऱ्यांची स्मशानभूमी' असे केले आहे. यावरून महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्येची भीषणता लक्षात येते.महाराष्ट्रात विदर्भात शेतकरी आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे. शेतकरी आत्महत्येच्या आकडेवारीमध्ये मात्र विविध अध्ययनात तफावत दिसून येते.

**✍ शेतकरीआत्महत्येची कारणे :**

शेतकरी आत्महत्येची अनेक कारणे सांगितली जातात, त्यात प्रामुख्याने गरिबी, कर्जबाजारीपणा, व्यसन, कौटुंबिक समस्या, शेतीतील समस्या, आजारपण, नैसर्गिक आपत्ती, अनुत्पादक कर्ज व खर्च, सामाजिक प्रतिष्ठा इ. करणे सांगितली जातात. यात शेतकरी आत्महत्येचे मुख्य कारण म्हणजे शेतमाल उत्पादन खर्च व शेतमालाला मिळणारी किमत यातील तफावत हे आहे.शेतकरी आत्महत्येची प्रमुख कारणे पुढील प्रमाणे आहेत.

**१. शेतकऱ्यांचाकर्जबाजारीपणा :**

कर्जबाजारीपणा शेतकरी आत्महत्येचे मुख्य कारण आहे.भारतातील शेतकरी हा 'कर्जात जन्मतो कर्जात जगतो कर्जातच मरतो व कर्जाची शिदोरी पुढील पिढीला देऊन जातो' ग्रामीण भागात सावकारी कर्जाचे प्रमाण जास्त आहे व ते मनमानी पद्धतीने व्याज वसूल करतात. त्यामुळे शेतकरी सावकारी कर्जाच्या जाळ्यात एकदा ओढला गेला की त्यातून सुटका होणे शक्य नाही. याशिवाय वडिलोपार्जित कर्ज असल्यामुळेही हा कर्जबाजारीपणा वाढत जातो.

**२. शेतमालाच्या घटत्या व अस्थिर किमती :**

शेतमालाच्या किमती सातत्याने अस्थिर असतात त्यामुळे शेतकरी कुठल्याही शेतमालाच्या किंमतीचा निश्चित अंदाज बांधू शकत नाही.त्याचा परिणाम उत्पादनावर व पिक निश्चितीवर होतो.शासन केवळ आधारभूत कींमती जाहीर करते मात्र उत्पादन वाढल्यास कींमती आधारभूत किंमतीपेक्षाही कमी झाल्या तरी शासन तो शेतमाल खरेदी करत नाही. व व्यापाऱ्यांना तशी सक्ती नसते.याचा परिणाम शेतकऱ्याच्या उत्पनावर होतो.

**३. अनुत्पादक कामासाठी कर्जाचा वापर :**

शेतकरी शेतीसाठी कर्ज घेतो पण त्याचा वापर अनेक वेळा लग्न, उत्सव व समारंभ या सारख्या बाबींवर होतो त्यातून उत्पन मिळत नाही पण कर्ज वाढत जाते.

**४. नोकरशाहीची दिरंगाई :**

अनेकवेळा संबधित शासकीय कार्यालयाकडून शेतकऱ्यांना अचूक माहिती वेळेवर उपलब्ध होत नाही. शासनाच्या योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहचत नाहीत यामुळे त्याचा लाभ शेतकऱ्यांना होत नाही.पिकांची आणेवारी कमी असतानाही जास्त दर्शवली जाते याचा परिणाम शेतीवर होतो.

**५. कृषी आदनांच्या वाढत्या कींमती :**

शासनाच्या अनुदान कमी करण्याच्या धोरणामुळे रासायनिक खते,बी–बियाणे, कीटकनाशक ,ठिबक संच इ. चे अनुदान कमी झाल्यामुळे त्यांच्या किंमतीत सातत्याने वाढ होत आहे.मजुरीदरात वाढ होत आहे त्यामुळे शेतीच्या खर्चात वाढ झाली आहे. पण उत्पनात त्या तुलनेत वाढ झाली नाही.यामुळे उत्पन व खर्चात मोठी तफावत निर्माण झाली आहे ही तफावत शेतकरी आत्महत्येचे मुख्ये कारण ठरते आहे.

**६. निसर्गाचा लहरीपणा :**

भारतातील बहुतांश शेती ही निसर्गावरच अवलंबून आहे म्हणून शेतीला 'निसर्गाचा जुगार ' म्हटले जाते.कधी अतिवृष्टी तर कधी अवर्षण याचा फटका कृषी उत्पादनाला बसतो. गारपीट, पिकांवरील रोगराई, बदलते हवामान याचा कृषीवर प्रतिकूल परिणाम होत आहे.

**७. अपुऱ्या जलसिंचन सुविधा :**

भारतात पंजाब, हरियाणा वगळता उर्वरित राज्यात जलसिंचन सुविधा मोठ्या प्रमाणात उपलब्ध नाहीत. त्यामुळे कोरडवाहू शेतीचे प्रमाण जास्त आहे, पावसाने उघडीप दिली का त्याचा थेट परिणाम कृषी उत्पादन कमी होण्यावर होतो.त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन कमी होते.



Scanned by CamScanner

**८. शासनाचे धोरण :**

शासन कृषीसाठी विविध योजना राबवते पण त्या प्रत्यक्षात राबवल्या जातातच असे नाही.अनेक योजना केवळ कागदोपत्री असतात. शेततळी, बंधारे यांची संख्या शासन दरबारी मोठी असते व त्यासाठी शासनही मोठा खर्च करते मात्र यातून शेतकऱ्यांना लाभ होण्याऐवजी दुसरेच दलाल श्रीमंत होतात.शासन केवळ योजना जाहीर करते पण त्या राबवण्याची जबाबदारी आपली नाही असेच दर्शवते त्यामुळे य योजनांचा लाभ शेतकऱ्यांना होत नाही.

**९. अपुरा वीज पुरवठा :**

महाराष्ट्रात शेतीसाठी केवळ ७ ते ८ तासच वीज उपलब्ध आहे याचा परिणाम सिंचन सुविधावर झाला आहे.

**१०. कृषी आधारित जोड व्यवसायांची कमतरता:**

शेतीला जोड व्यवसायांचे प्रमाण भांडवलाअभावी व योग्य बाजारपेठेअभावी कमी आहे. दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन किंवा कृषीमालावर प्रक्रिया करणारे लहान उद्योग कमी असल्यामुळे शेतकऱ्यांकडे पर्यायी उत्पनाची साधने उपलब्ध नाहीत त्यामुळे शेतकरी पूर्णतरू शेतीवरच अवलंबून आहे.

**११. बँका शेतीला कर्ज पुरवठा करण्यास अनुत्सुक असतात :**

बँका इतर क्षेत्राला ज्या सहजतेने कर्ज पुरवठा करतात तेवढी सहजता व आपुलकीने शेतीला मात्र कर्ज पुरवठा केला जात नाही कारण शेती क्षेत्रात अनिश्चितता जास्त आहे. त्यामुळे परतफेडीची शक्यता कमी असते.म्हणजेच शेतकऱ्याला वेळेवर व पुरेशे भांडवल उपलब्ध होत नाही. भारतात अजून पर्यंत एकही शेतकरी बँकाचे कर्ज बुडवून व आपली संपती विकून परदेशात पळून गेला नाही हे वास्तव आहे.

**१२. बी—बियाणे उत्पादक कंपन्याकडून फसवणूक**

**१३. सामाजिक प्रतिष्ठेपायी होणारा अवास्तव खर्च**

**१४. सामाजिक सहानुभूती व आधाराची कमतरता**

**✍ शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी उपाययोजना :**

व्यसनाधीनता,आजारपण,कौटूम्बिकसमस्या, सामाजिकप्रतिष्ठा, अनुत्पादक कर्ज व खर्च यसमस्या तर अनेक व्यापारी, उद्योजक, राजकीयपुढारी, नोकरदारइत्यादिनाहीया समस्यांना तोंड द्यावे लागते. शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणा पेक्षा यांचे कर्जाचे प्रमाण खूप जास्त असते मात्र त्यांनी कधी आत्महत्या केल्याचे ऐकिवात नाही.शेतकऱ्याला आत्महत्येपासून परावृत्त करण्यासाठी मुलभूत उपाय योजण्याची आवश्यकता आहे.

**१. शेतमालाला योग्य किंमत :**

शेतमालाव्यतिरिक्त प्रत्येक वस्तूंची किंमत ही खर्च, नफा य आधाराने निश्चित होते.शेतमालाची किंमत मात्र प्रत्येक्षात खर्चावर आधारित नाही.त्यामुळे शेतमालाच्या कींमती सुद्धा खर्च, नफा य तत्वानेच शेतकऱ्यांना प्रत्यक्ष उपलब्ध करून करून द्याव्यात ज्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होऊन शेतीचा विकास होईल.

**२. सहज,स्वस्त, वेळेवर व पुरेशा कर्जाची उपलब्धता :**

भांडवल हा उत्पादन कार्यातील महत्वाचा घटक आहे.उद्योगांप्रमाणेच शेतीतही भांडवलाची आवश्यकता असते.बी—बियाणे, रासायनिक खते, किंवा इतर कृषी साहित्यासाठी शेतकऱ्यांनाभांडवलाची आवश्यकता असते.अशावेळेस शेतकऱ्यांना कमी व्याजदरात, सहजतेने, वेळेवर व आवश्यक तेवढा कर्ज पुरवठा बँकानी करावा ज्यामुळे सावकारी कर्जाचे प्रमाण कमी होईल.

**३. शेतकऱ्यांची फसवणूक थांबवणे :**

अनेक बी—बियाणे, कीटकनाशक कंपन्या दर्जाहीन साहित्य पुरवतात यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनाबरोबरच आरोग्यावरही प्रतिकूल परिणाम होतो. अनेक उत्पादक व विक्रेते बी—बियाणे, रासायनिक खते इ. ची कृत्रिम टंचाई निर्माण करून अधिक किंमत वसूल करतात.त्यावर शासनाने कडक कारवाई करणे.

**४. जलसिंचन सुविधात वाढ करणे:**

जलसिंचन सुविधा उपलब्ध असल्यास शेतीला आवश्यकते प्रमाणे पाणी उपलब्ध होते. त्यामुळे उत्पादनात वाढ होऊन वर्षातून दोन ते तीन वेळा पिक घेता येतात. जलसिंचन सुविधांमध्ये वाढ करण्यासाठी पाण्याचे व्यवस्थापन योग्य रीतीने करणे. त्यासाठी पावसाचे पाण्याचा सुयोग्य वापर करणे त्यातून भूपृस्ट व भूगर्भजल पातळीत वाढ होऊन शेतीला अधिक



Scanned by CamScanner

जलसिंचनाची उपलब्धता होईल. कमी पाण्यात अधिक उत्पादन देणारी पिक लागवडीसाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे.ठिबक सारख्या आधुनिक जलसिंचन साधनांचा अधिक वापर करणे.

**५. शेतीपूरक व्यवसायांचा विकास**

शेतकरी पूर्णतरू शेतीवर अवलंबून असल्यामुळे निसर्गाची अवकृपा किंवा इतर कारणामुळे कृषी उत्पादन कमी झाल्यास शेतकऱ्याकडे पर्यायी उत्पनाची साधने नसतात. पर्यायी उत्पनाची साधने शेतकऱ्यांकडे असावीत यासाठी दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, शेळी पालन किंवा इतर व्यवसाय सुरु करण्यासाठी शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन, भांडवल व बाजारपेठ उपलब्ध करून द्यावी.

**६. शासकीय योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी**

शेतकरी आत्महत्या कमी करण्यासाठी शासन विविध योजना राबवते पण त्यातील काही योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहचत नाहीत किंवा राबविल्या जात नाहीत त्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे करावी व या योजनांचा नेमका किती शेतकऱ्यांना प्रत्यक्ष फायदा झाला याची दरवर्षी पडताळणी करणे. शासकीय योजनांतील भ्रष्टाचार थांबविणे.

**७. कृषी उत्पादनात विविधीकरण**

शेतकरी अनेकवेळा सातत्याने एकच उत्पादन घेतो त्यामुळे त्या शेतमालाची किंमत कमी झाली किंवा इतर कारणांमुळे उत्पादन कमी झाले तर शेतकऱ्यांना तोटा होतो, हे टाळण्यासाठी अनेक पिकांचे उत्पादन घेणे यामुळे एका उत्पादनातील जोखीम कमी होते.

**८. आधुनिक तंत्रज्ञानाचा विकास**

शेतीमध्ये दिवसेंदिवस शेतमजुरांची संख्या कमी होत आहे.त्यामुळे शेतीच्या अनेक कामाना वेळेवर मजूर उपलब्ध होत नाहीत, त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरात वाढ करण्यासाठी ते शेतकऱ्यांना सहजतेने उपलब्ध करून देणे.त्याच्या वापरासंबधीचे मार्गदर्शन करणे.

**९. शेतकऱ्यांना आत्महत्या करण्यापासून परावृत्त करणे :**

आत्महत्या हे काही कुठल्याही समस्यवरिल उपाय नाही हे शेतकऱ्यांच्या मनावर बिंबवणे त्यासाठी कार्यशाळा घेणे. शेतकऱ्यांना सामाजिक सहानुभूती व आधार देणे.असे उपाय योजून शेतकऱ्यांना आत्महत्येपासून परावृत्त करणे.

१०. पुरेशी वीज उपलब्धता करणे.

११. खाजगी सावकारीसाठी कायद्याची कठोर अंमलबजावणी करणे.

१२. कृषीक्षेत्रात खाजगी गुंतवणुकीला प्रोत्साहन देणे.

१३. कृषी पिक विमा योजनेतून योग्य नुकसान भरपाई देणे.

१४. वायदेबाजाराची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहचवणे.

१५. हवामान खात्याने अचूक अंदाज वर्तविण्याचा प्रयत्न करणे.

१६. पुरेशा व आवश्यकतेप्रमाणे वातानुकुलीत साठवणूक सुविधा निर्माण करणे.

**सारांश :**

शेतकरी आत्महत्या ही केवळ भारताचीच समस्या राहिली नसून जगातील काही देशातही शेतकरी आत्महत्या करित आहेत. भारतात विशेषतरू महाराष्ट्रात या समस्यने उग्र रूप धारण केले आहे.शेतकरी आत्महत्या कमी करण्यासाठी शासनाने केलेल्या उपाययोजना प्रभावी ठरल्या नाहीत हे यावरून सिद्ध होते.शेतकरी आत्महत्या कमी करण्यासाठी कृषीक्षेत्राबाहेरील व्यक्तीबरोबरच प्रत्यक्ष शेती करणाऱ्यांचाही समावेश उपाय योजना करताना असावा. शेतकऱ्यांचे उत्पन वाढीसाठी सर्वकष प्रयत्न करणे याशिवाय आत्महत्या कमी करण्याचा दुसरा प्रभावी उपाय नाही. भारतला आर्थिक महासत्ता व्हावयाचे असेल तर अन्नदाता जगला पाहिजे.

**संदर्भ ग्रंथ :**

१. विष्णू ढोबळे, शेतकऱ्यांच्या आत्महत्यारू जागतिकीकरणातील शोकांतिका,सुगावा प्रकाशन,पुणे.

२. एन.सी.आर.बी. इंडीया,रिपोर्ट .२०१५

३. वर्तमान पत्र – महाराष्ट्र टाइम्स,प्रभात, अग्रोवन, लोकसत्ता

४. विकीपेडिया

□□□



Scanned by CamScanner

**Purchase Back Issues**

If you need to international journals back issue.
Please fill order from and enter your Postal Address/ mailing address.
No extra charge for parcel. Parcel dispatched by registered post on your address.
Plz allow 2 weeks for Hard copy delivery.
http://www.vidyawarta.com/02/?p=4293




**Gift Subscription**

Get available issues on your address.
If you gift the hard copy of our international journal Or your published paper issue.
http://www.vidyawarta.com/02/?p=4300

IMPACT FACTOR 4.014 iijif

Indexed


ISSN-2319 9318

₹ 400/-



***Publisher & Owner***

Archana Rajendra Ghodke
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh, Tq.Dist.Beed-431 126
(Maharashtra) Mob.09850203295
E-mail: vidyawarta@gmail.com
www.vidyawarta.com

***Edit By***

Dr. Gholap Bapu Ganpat
Parli Vaijnath, Dist.Beed 431 515
(Maharashtra, India)
Cell : +91 75 88 05 76 95



Scanned by CamScanner